# प्रेस नोट

दिनांक :- ०४/०२/२०२६

१) श्री.सखाराम नरसिंग पवार, वय ४९ वर्ष,पद - उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस जि.यवतमाळ, वर्ग-२, २) आशिष काशिनाथ शेलोकार, वय ४७ वर्ष पद- नझुल परिरक्षण भूमापक, भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस जि. यवतमाळ वर्ग-३ यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद कमांक व कलम | अप क्र. ८४/२०२६ पोलीस स्टेशन दिग्रस जिल्हा यवतमाळ<br>कलम ७,७ A, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | १) श्री.सखाराम नरसिंग पवार, वय ४९ वर्ष,पद - उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस जि.यवतमाळ, वर्ग-२, २) आशिष काशिनाथ शेलोकार, वय ४७ वर्ष पद- नझुल परिरक्षण भूमापक, भूमी अभिलेख कार्यालय, दिग्रस जि. यवतमाळ वर्ग-३ |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५००० /- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५०००/- |
| थोडक्यात हकिकत | तक्रारदार यांनी, दिनांक २२/०१/२०२६ रोजी लोकसेवकांविरुध्द तक्रार दिली की, तक्रारदार श्रीमती.मारीया सलमान खान यांचे सासरे यांनी त्यांच्या मालकिची मालमत्ता तक्रारदार व त्यांचे पती यांना मुस्लीम पर्सनल लॉ नुसार हिबा(ओरल गिफ्ट) करुन दिली होती. सदर मालमत्ता हिबा नुसार फेरफार करुन मिळण्याकरिता भूमी अभिलेख कार्यालय दिग्रस येथील आशिष काशिनाथ शेलोकार यांना भेटुन विचारणा केली असता ते लाच मागणी करित असल्याबाबत तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ येथे दिली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०३/०२/२०२६ रोजी पडताळणी केली असता पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष आ.लो.से. क्र.२ यांनी स्वत:करिता व आलोसे क्र.१ यांचे करिता ५००० रु लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र.२ यांनी तक्रारदार यांचेकडुन ५०००रु लाच रक्कम स्विकारली. लाच रक्कम स्विकारल्यानंतर आरोपी क्र.२ यांनी लाच रकमेमधील २५००रु स्वता:जवळ ठेवले व २५०० रु आरोपी क्र.१ श्री. पवार यांना दिली.दोन्ही आरोपीकडुन लाच रक्कम पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली व आलोसे विरुद्ध गुन्हा दाखल करुन तपासात घेतला व गुन्हयाचे तपासकामी आलोसे यांना अटक करण्यात आली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक, यवतमाळ
संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in
टोल फ्री कमांक :- १०६४ दुरध्वनी कमांक :- ०७२३२- २४४००२/८९७५७९१०६४

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७
श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६
श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(अभय आष्टेकर)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ